महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणी साठयामधील गाळ काढण्याच्या कामास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन

नियोजन (रोहयो) विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०१४/प्र.क्र.०६/मग्रारो-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: १९ जानेवारी, २०१५

संदर्भ :

१) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. १८/रोहयो-१, दिनांक २२ मार्च, २०११

२) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. १८/रोहयो-१, दिनांक २९ जुलै, २०११

३) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. १८/रोहयो-१, दिनांक १४ सप्टेंबर, २०१२

४) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र. १८/पुनर्बांधणी/रोहयो-१, दिनांक १८ सप्टेंबर, २०१२

५) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र. १८/पुनर्बांधणी/ रोहयो-१, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१२

६) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.१८/पुनर्बांधणी/रोहयो-१, दिनांक २८ मार्च, २०१३

७) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.१८/पुनर्बांधणी/रोहयो-१, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४

८) नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०१४/प्र.क्र.०६/मग्रारो-१ दिनांक ९ सप्टेंबर, २०१४

परिपत्रक:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा-२००५ मधील अनुसूचि-१ मधील उप कलम १ (५) नुसार पारंपारिक जलस्त्रोतांतील गाळ काढण्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय करण्यात आले आहे. शासनाने संदर्भ क्र.१ ते ८ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव तलाव, पाझर तलाव अशा पारंपारिक पाणी साठ्यामधील गाळ काढण्याच्या कामासाठी वेळोवेळी शासन निर्णय व शासन परिपत्रके निर्गमित केलेली आहेत.

२. तद्नुसार संदर्भ क्र.८ येथील शासन परिपत्रक दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ नुसार गाळ काढण्याच्या कामास दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, आता गाळ काढण्याच्या कामास खालीलप्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत:

१) गाळ काढण्याची कामे जानेवारी ते जुन या कालावधीत घेण्यात यावीत.

२) सद्याची टंचाई परिस्थिती विचारात घेता गाळ काढण्याची कामे जुन, २०१५ पर्यंत अनुज्ञेय राहतील.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाळ काढण्याची कामे शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार हाती घेण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन

19/1/2015

प्रत :-

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
आयुक्त (कृषी), कृषि आयुक्तालय, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई
आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणेल
सर्व जिल्हाधिकारी
प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
संचालक, फलोत्पादन, पुणे
संचालक, भुजल विकास यंत्रणा विकास, पुणे
सर्व जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व गट विकास अधिकारी
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
(महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)